परिपत्रक - ७३

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
आस्थापना माध्यमिक विभाग
**दिनांक - २८/०१/२०१९**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये, माध्यमिक विद्यालयांशी संलग्नित सर्व उच्च माध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये, आश्रमशाळा, प्राथमिक शाळा, रयत शिक्षण संस्था.

यांना------

**विषय :- रयत विज्ञान पत्रिकेच्या बाराव्या अंकासाठी लेख व माहिती पाठविणेबाबत...**

रयत शिक्षण संस्थेच्या 'रयत विज्ञान परिषदे' मार्फत **रयत विज्ञान पत्रिकेचा** बारावा अंक दि.९ मे २०१९ रोजी प्रकाशित होणार आहे. या अंकाव्दारे विद्यार्थी, शिक्षक व समाज घटकात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणेसाठी विज्ञान कथा, वैज्ञानिक लेख, विज्ञान कविता तसेच पर्यावरण रक्षण, अंधश्रध्दा निर्मूलन, आरोग्य रक्षण यासारख्या विषयावर आपले लिखाण rayatvidnyanpatrika@gmail.com वर दि.१० फेब्रुवारी २०१९ पर्यंत पाठवावे.

- सदर लेख ५०० शब्दांपर्यंत असावेत. लेख लिहीताना वाचनिय होईल याची काळजी घ्या.
- लिखाण मराठीत असावे आणि ते स्वत:चेच असावे. यापूर्वी प्रकाशित झालेले लिखाण पाठवू नये.
- लेख कोणत्याही फॉंट मध्ये असले तरी चालतील पण लेख पी.डी.एफ.(PDF) मध्ये पाठवावे. त्यामुळे कोठेही वाचता येतील.
- लेखासोबत संबंधित फोटो, चित्रे असल्यास ते (PDF) न करता पाठवावेत.
  फोटोचा आकार व रिझोल्युशन बदलणे सोपे होते. लेख व फोटो एकाच मेलमध्ये पाठवा.
- लेखकाने आपले नाव, शाखेचे नाव, संपर्क नंबर व शेवटी न विसरता ई-मेल लिहावा.
  सुचनेनुसार बदल सांगितल्यास करुन द्यावा.

पृष्ठ संख्या मर्यादित आहे. लेखाचे संपादन करणे, लेख छापणे याबाबत अंतिम निर्णय संपादक मंडळाचा असेल. संपादकाशी याबाबत पत्रव्यवहार करु नये.

- आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची अथवा शिक्षकाची राज्य, विभाग वा देश स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात बालविज्ञान परिषदेत अथवा इन्स्पायर आवार्डसाठी निवड झाली असल्यास संबंधित माहिती शाळा, विद्यार्थी नाव, मार्गदर्शकाचे नाव व कोठे गेला होता ते कळवावे.
- विद्यालयातील शिक्षकांनी रयत विज्ञान परिषदे व्यतिरिक्त राज्य वा राष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध सादर केला असेल तर त्याचीही माहिती पत्रिकेसाठी कळवा.
- हा अंक दर्जेदार व्हावा यासाठी विज्ञान शिक्षकांनी योगदान द्यावे.

रयत शिक्षण संस्था सातारा

**सहसचिव,(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

**प्रत माहितीसाठी -**
१) मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.
२) मा.सहसचिव(उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा.
**कार्यवाहीसाठी रवाना -**
सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा.